# सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
## नविन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१

कार्यालय :०२०-२६१२२५००,२६१२७२१७ फॅक्स : (०२०) २६१३३०८२ E-Mail : comm_audit@rediffmail.com


---

जा.क्र.सआ/अंनिलेप/लेप/सहकारी संस्था/नामिका/९१६/२०१४
दिनांक :- २२/ ०९ /२०१४

प्रति,
१.जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था सर्व
२.जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१
सहकारी संस्था सर्व

**विषय :-** <u>**लेखापरीक्षकाचे ऑनलाईन अर्ज छाननी करणेसाठी मार्गदर्शक सुचना........**</u>
**संदर्भ :-** या कार्यालयाचे जा.क्र.सआ/अंनिलेप/लेप/सहकारी संस्था/नामिका/८७४/२०१४, दिनांक १२/०९/२०१४ चे सुधारित परिपत्रक

उपरोक्त विषय व संदर्भाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे कि,

संदर्भिय परिपत्रकान्वये लेखापरिक्षकाच्या ऑनलाईन अर्जाची छाननी करणेसाठी खालीलप्रमाणे बाबी विचारात घ्याव्यात.

**अ) <u>सनदी लेखापाल फर्म साठी ऑनलाईन अर्ज छाननी करतांना घ्यावयाची काळजी</u> -**

(1) सर्व भागीदारांचे (पार्टनर) फोटो सुस्पष्ट असावेत.

(2) ॲफिडेव्हीट नवीन विहित नमुन्यात व मूळ प्रत स्कॅन करून अपलोड केलेले असावे.

(3) भागीदार हे इतर स्विकृत पार्टनरशिप फर्ममध्ये किंवा व्यक्तीगतरित्या लेखापरीक्षक म्हणून स्विकृत नसावेत. सर्व भागीदारांनी मेंबरशिप नंबर नमूद करणे आवश्यक आहे.

(4) सर्व भागीदारांची C.O.P. (सर्टीफिकेट ऑफ प्रॅक्टीस) प्रमाणपत्र किंवा कंस्टयुटिशन सर्टिफिकेट (स्टेटस रिपोर्ट) अपलोड करण्यात यावेत.

(5) जे सनदी लेखापाल नुकतेच परीक्षा पास झाले आहेत किंवा इतर कारणाने C.O.P. प्राप्त झाले नाही अशा सनदी लेखापाल यांच्या बाबतीत सी.ए. इन्स्टीटयुट कडील Status Report ग्राहय धरावा.

(6) लेखापरीक्षकांचा ग्रेड अनुभवानुसारच दिला जाईल याची खात्री करण्यात यावी.

(7) सी.ए. फर्म मध्ये किमान दोन भागीदार असावेत व मराठीचे ज्ञान आवश्यक आहे.

(8) सी.ए. ची फर्म ही सी.ए. इन्स्टिटयुट कडे भागीदारी संस्था म्हणून रजिस्टर्ड असावी. ती वेबसाईटवर आपणास तपासणीस उपलब्ध होऊ शकते.

(9) ब्लॅकलिस्टेड लेखापरीक्षक पॅनेलवर येणार नाहीत याची काळजी घ्यावी.

**ब)** **<u>सनदी लेखापाल साठी ऑनलाईन अर्ज छाननी करतांना घ्यावयाची काळजी</u>** -

(1) मराठीचे ज्ञान आवश्यक आहे.

(2) सनदी लेखापाल यांना इतर पदवी प्रमाणपत्र मागणी करण्यात येऊ नये व त्यासाठी ऑनलाईन अर्ज अस्विकृत करु नये.

(3) अनुभव गृहीत धरतांना फक्त सहकारी संस्थांचा वैधानिक, सतत व समवर्ती किंवा अंतर्गत लेखापरीक्षणाचा अनुभव गृहीत धरावा. हा अनुभव सनदी लेखापालांची भगीदारी संस्था वगळता C.O.P. प्राप्त झाल्यानंतर किमान एक वर्ष मुदतीचा असावा किंवा C.O.P. प्राप्त झालेनंतर स्वत:चे नावावर अंतर्गत, वैधानिक, सतत-समवर्ती पध्दतीने एक वर्षाचा सहकारी संस्थेच्या लेखापरीक्षणाचा अनुभव असावा.

(4) लेखापरीक्षकांचा ग्रेड ची खात्री करण्यात यावी.

(5) ऑफिडेव्हीट नवीन विहित नमुन्यात असावे .

(6) वैयक्तिक सनदी लेखापाल यांचे बाबत C.O.P. प्राप्त झालेनंतर सनदी लेखापाल फर्ममध्ये किमान एक वर्ष सहकारी संस्थेच्या लेखापरीक्षणाचा अनुभव असल्यास त्याचे प्रमाणपत्र जाडावे.

(7) ब्लॅकलिस्टेड लेखापरीक्षक पॅनेलवर येणार नाहीत याची काळजी घ्यावी.

**क)** **<u>प्रमाणित लेखापरिक्षकांचा Online form छाननी करताना घ्यावयाची काळजी-</u>**

(1) फोटो सुस्पष्ट असावा

(2) ऑफिडेव्हीट नवीन विहित नमुन्यात असावे

(3) मागील २०१३ चे यादीत स्विकृत नसावे.

(4) जी.डी.सी ॲन्ड अे व डिग्री प्रमाणपत्र मुळ प्रतीत स्कॅन करुन टाकलेले असावे.

(5) अनुभवाचा पुरावा अपलोड केलेला असावा उदा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक/जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था या कार्यालयाची लेखापरीक्षण अहवाल पोहोच असावी किंवा सनदी लेखापाल / सनदी लेखापाल फर्म यांचेकडे जीडीसीअे पास झाल्यानंतर सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण केलेले अनुभव यांचे मूळ प्रमाणपत्र अपलोड केलेले असावे व तो जीडीसीअेची अर्हता प्राप्त झालेनंतरचा किमान 3 वर्षांचा असावा.

(6) प्रमाणित लेखापरिक्षक यांनापॅनेल वर येणेसाठी जीडीसीऐ परिक्षा उत्तीर्ण झालेनंतर किमान ३ वर्षाचा परंतु जास्तीत जास्त १० वर्षापर्यंत अनुभव असल्यास क वर्गामध्ये वर्गवारी करावी. १० वर्षापेक्षा अनुभव अपलोड केला असल्यास ब वर्गवारी दयावी. प्रमाणित लेखापरिक्षकांनी प्रत्येक वर्षाचे अनुभवासाठी किमान १ संस्थेचे लेखापरिक्षण अनुभव अपलोड करणे आवश्यक आहे.

(7) लेखापरीक्षकांना प्रदान केलेल्या ग्रेड ची अनुभवानुसार खात्री करण्यात यावी.

(8) सेवानिवृत्त लेखापरीक्षकाची लेखापरीक्षणाचा अनुभव निवृत्त झालेल्या कार्यालयातून प्राप्त करुन घेऊन अपलोड करावे. त्यानुसार त्यांचा ग्रेड निश्चित करावा.

(9) ब्लॅकलिस्टेड लेखापरीक्षक पॅनेलवर येणार नाहीत याची काळजी घ्यावी.

ड) **<u>शासकीय लेखापरीक्षकांचा ऑनलाईन अर्ज छाननी करतांना घ्यावयाची काळजी</u>** –

(1) फोटो सुस्पष्ट असावा

(2) दोन वेळेस फॉर्म Submit होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(3) लेखापरीक्षकांचा ग्रेड ची खात्री करण्यात यावी.

नवीन ऑनलाईन नोंदणी चालू असल्याने मागील नंबर नमूद नसणा-या लेखापरीक्षकाचा फॉर्म अस्विकृत करु नये. लेखापरीक्षकाचे फॉर्म अस्विकृत करताना सुस्पष्ट कारणे नमूद करावीत. दुरुस्तीचे अधिन राहून स्विकृत करण्यात येऊ नये. मागील स्विकृत लेखापरीक्षकांनी ग्रेड बदलण्यासाठी पून्हा अर्ज केलेला असेल तर त्यांना अस्विकृत करण्याची शिफारस करण्यात येवून नविन अर्जाची शिफारस होणे आवश्यक आहे.

परिपत्रकीय आदेशात नमुद केल्याप्रमाणे ऑनलाईन ऑडीटर व्हॅलीडेशनचे काम पूर्ण करावयाचे आहे. सदर काम मुदतीत पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही आपण आपल्या स्तरावरून करण्यात यावी.

**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पूणे.**

**प्रत माहितीसाठी**
विभागीय सहनिबंधक (प्रशासन/लेखापरीक्षण) सर्व